आमचं लिहिणं, आमची भाषा ! आमचं जगणं, आमची "आशा" !

आंशूराज प्रकाशनचे लोकप्रिय वृत्तपत्र

Reg.No. MAH-MAR-24172/2003

दैनिक/साप्ताहिक

# युवा मराठा

बहुजन समाजाच्या चळवळीसाठी समर्पित

मुख्य संपादक- राजेंद्र पाटील -राऊत

व्यवस्थापकीय संपादक- श्रीमती आशाताई बच्छाव

आवृत्ती संपादक - सुर्यकांत भोर

निवासी संपादक - उमेश पाटील

पुणे आवृत्ती | वर्ष २२ वे | अंक : ४ | शनिवार, दि. ९ ते १५ ऑगस्ट २०२५ | पाने ४ | किंमत ४ ₹

**पत्रकार नेमणे आहेत**

संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात व तालुक्यात आणि महत्वाच्या ठिकाणी तात्काळ दै./सा. युवा मराठा न्युजपेपर्स/वेब न्युज चॅनलसाठी पत्रकार नेमणे आहेत. इच्छुकांनी संपर्क साधावा.

संपर्क:९८५०४४७६८५
९९२३३६२०३०

## लोकहित माहिती अधिकार पत्रकार व पोलीस संरक्षण संघटना



# लोकहित माहिती अधिकार पत्रकार व पोलिस संरक्षण संघटनेची स्थापना, राज्य कार्यकारिणी जाहीर: राजेंद्र पाटील– राऊत

**मालेगाव :— अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार विरोधी क्रांतीकारी चळवळ उभी करणारी राज्यस्तरीय संघटनशक्ती 'लोकहित माहिती अधिकार पत्रकार व पोलीस संरक्षण संघटना' महाराष्ट्र क्रांतीदिनाच्या पुर्वसंध्येला स्थापना करण्यात आली असून,राज्य कार्यकारिणी घोषित करण्यात आल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष राजेंद्र पाटील राऊत यांनी दिली.**

लोकहित माहिती अधिकार पत्रकार व पोलीस संरक्षण संघटनेची राज्यस्तरीय कार्यकारिणी पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात आली आहे. रामभाऊ आवारे, (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष निफाड नाशिक), दिलीप पाटील (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष) पलूस सांगली, गोरखनाथ कुनगर (प्रदेश उपाध्यक्ष नाशिक),भारत पवार (प्रदेश उपाध्यक्ष ओझर), नरेंद्र पाटील (प्रदेश उपाध्यक्ष जळगाव), राजेंद्र होळकर (प्रदेश उपाध्यक्ष लासलगाव), प्रथमेश गायकवाड (प्रदेश राज्य सचिव ठाणे), उमेश कुलकर्णी (प्रदेश राज्य सचिव ओझर), फैय्याज मोमीन (प्रदेश राज्य कोषाध्यक्ष भिवंडी ठाणे), मुजाहिद मोमीन (अल्पसंख्याक प्रदेश अध्यक्ष रायगड), शत्रुघ्न निकम (भटके विमुक्त जाती जमाती प्रदेश अध्यक्ष सोलापूर), सुर्यकांत भोर (महाराष्ट्र राज्य प्रसिध्दीप्रमुख पुणे), सुदर्शन बर्वे (नाशिक जिल्हा अध्यक्ष भागूर नाशिक)आदींची निवड करण्यात आली असून, लवकरच जिल्हा व तालुकास्तरावर नियुक्त्या जाहिर करण्यात येऊन, संघटनेच्या खेडोपाडी शाखा स्थापन केल्या जाणार असल्याचे महाराष्ट्र राज्य प्रदेश अध्यक्ष रामभाऊ आवारे यांनी सांगितले.तर नावनोंदणी शुल्क जमा केलेल्या पदाधिकाऱ्यांना लवकरच विमा प्रमाणपत्र आणि नियुक्ती व ओळखपत्र वितरीत केले जाणार असल्याची माहिती संघटनेच्या प्रसिध्दी पत्रकातून देण्यात आली आहे.



## हिंजवडीतील आयटी कंपनीत एनएसजी कमांडोचं 'मॉक ड्रिल' हेलिकॉप्टर ही आलं

पुणे : निवासी संपादक उमेश पाटील

आयटी पार्क हिंजवडीत आज एनएसजी कमांडोकडून मॉक ड्रिल पार पडत आहे. यासाठी एनएसजीचं हेलिकॉप्टर देखील याठिकाणी आलं आहे.

आयटी कंपनीत अतिरेकी हल्ला झाला तर काय खबरदारी घ्यावी? आणि रेस्क्यू ऑपरेशन कसं पार पाडता येईल. या अनुषंगाने सर्व प्रात्यक्षिक पार पडत आहेत. याठिकाणी कंपनीच्या बाहेर स्थानिक पोलिसांचा मोठा बंदोबस्त आहे. कंपनीच्या आवारात केवळ एनएसजी कमांडो आहेत. बाहेरच्या कोणाला ही आत प्रवेश दिला जात नाही.

दरम्यान मॉक ड्रीलच्या या प्रकारामुळे हिंजवडी परिसरात काही काळ घबराटीचे वातावरण पसरले होते. या ठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्त तसेच एनएसजीचे कमांडो आल्यामुळे नेमकं काय घडलं याची जोरदार चर्चा रंगू लागली होती. दरम्यान मॉक ड्रिल असल्याचे समोर आल्यामुळे नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला

# मारुंजी ग्रामस्थांचा रस्ता रुंदीकरणाला विरोध पर्यायी मार्ग आणि योग्य मोबदल्याची मागणी

पुणे :— आवृत्ती संपादक सूर्यकांत भोर

रस्ता रुंदीकरणाच्या प्रस्तावाला तीव्र विरोध दर्शवत हिंजवडी, माण पाठोपाठ मारुंजी (ता. मुळशी) ग्रामस्थांनी विशेष ग्रामसभा बोलावून प्रस्तावित रस्ता रुंदीकरणाला विरोध दर्शविला. गावठाणातील रस्ते रुंद करण्यामुळे गावाच्या जुन्या घरांचा, मंदिरांचा आणि सांस्कृतिक वारशाचा भाग धोक्यात येण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली.



विकासाच्या नावाखाली गावाच्या हृदयात हस्तक्षेप न करता पर्यायी मार्ग शोधण्याची आणि योग्य आर्थिक मोबदला देण्याची मागणी करण्यात आली. गावाने आयटी पार्कच्या उभारणीसाठी जमिनी दिल्याने परिसरात भव्य आयटी पार्क उभे राहिले. परंतु, या विकास प्रक्रियेत टाउन प्लॅनिंगचा पूर्णपणे अभाव होता. रस्त्यांचे नियोजन, वाहतूक व्यवस्था, पाणीपुरवठा, ड्रेनेज, शाळा आणि रुग्णालय यांसारख्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष झाले. याचा परिणाम म्हणून आज गावाला तीव्र वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असल्याचे मत ग्रामस्थांनी मांडले.या समस्येवर उपाय म्हणून प्रशासनाने गावठाणातील रस्ते रुंदीकरणाचा घाट घातला परंतु विकास हवा मात्र, ग्रामस्थांच्या भावना पायदळी तुडवू नका असे म्हणत रस्ता रुंदीकरणाऐवजी पर्यायी मार्ग तयार करावेत आणि रस्त्याची रुंदी २४ मीटर ठेवावी. तसेच, रुंदीकरण आवश्यक असल्यास, प्रभावित ग्रामस्थांना योग्य आर्थिक मोबदला द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. ग्रामस्थांनी एकजुटीने आंदोलन करण्याची तयारीही दर्शवली आहे.

(पान ३ वर पहा)

# अजित पवारांविरोधात ग्रामस्थ आक्रमक

## रस्त्यावरुन न्यायालयात जाण्याचा इशारा!



पुणे निवासी संपादक उमेश पाटील

पिंपरी– चिंचवड : आयटी हब हिंजवडीच्या विकास कामांवरून ग्रामस्थ विरुद्ध उपमुख्यमंत्री अजित पवार असा संघर्ष सुरू झाला आहे. गेल्या महिनाभरात अजित पवार यांनी हिंजवडीचा दोन वेळेस पाहणी दौरा केला आहे. अनेक ठिकाणी बदल करण्याच्या सूचना अजित पवारांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. यावर ग्रामस्थ मात्र नाराज आहेत.

अजित पवार हिंजवडी ग्रामस्थांना विश्वासात घेत नाहीत. असा आरोप सरपंच गणेश जांभुळकर यांनी केला आहे. अजित पवारांनी योग्य मार्ग न काढल्यास आगामी काळात न्यायालयाचा दरवाजा ठोठावणार असल्याचं आजच्या ग्रामसभेत ठराव झाला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डांगे चौक आणि वाकडच्या दिशेने जाणारा रस्ता अरुंद आहे. त्याच रुंदीकरण करण्यात येणार असल्याने हिंजवडी गावठाणचा काही भाग

पान ३ वर पहा

राजेंद्र पाटील-राऊत लिहिताहेत
सडेतोड अग्रलेख



संपादकीय

# ‘लाडकी बहिण’ घोटाळा!

राज्यात लोकप्रिय आणि गेमचेंजर ठरलेली ‘लाडकी बहीण योजना’ सध्या एनकेन कारणाने वादात आहे. ही सरकारी योजना केवळ महिलांसाठी असली तरी त्याचे लाभार्थी चक्क पुरुष असल्याचे उघड झाल्याने, ‘आता काय बोलणार!’ असा प्रश्न निर्माण झाला. लाडकी बहीण योजनेचे निकष डावलून लाभ घेणाऱ्या पुरुष लाभार्थी संख्या थोडीथोडकी नाही, तर सुमारे १४ हजारांपेक्षा अधिक आहे!, त्या जोडीला दोन हजारांपेक्षा अधिक सरकारी नोकरदार महिलांनी या योजनेतून दरमहा दीड हजार रुपये कमावले आहेत. राज्य सरकारच्या नोकरीत काम करणाऱ्या चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांचे वार्षिक उत्पन्न सरासरी चार लाख रुपयांपेक्षा अधिक आहे. या योजनेसाठी अडीच लाखांपेक्षा कमी उत्पन्नाची अट असतानाही, महिला सरकारी कर्मचाऱ्यांनी लाभ कसा घेतला? हा आता पडताळणीचा भाग झाला आहे. या सरकारी नोकरदार महिलांकडून पुन्हा पैसे घेणार? त्यांच्यावर कारवाई होणार का? हे प्रश्न अद्याप अनुत्तरीत आहेत. या योजनेचे आतापर्यंत ज्यांच्या बँक खात्यात पैसे जमा झाले, अशा एकूण २ कोटी ३४ लाख महिला लाभार्थी आहेत. योजनेच्या नावाखाली सरकारी पैशांचा गैरवापर झाल्याची अनेक प्रकरणे उघडकीस आली. त्याचे अनेक किस्से कानावर पडतात. राज्य सरकारने सर्व अर्जांची छाननी सुरू केल्यानंतर जून महिन्यांपर्यंत २६ लाख महिलांचा लाभ तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्याचा निर्णय सरकारने घेतला. वार्षिक अडीच लाखांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील महिलांनाच यापुढे लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळणार आहे, असे मंत्री अदिती तटकरे यांनीही स्पष्ट केले आहे. त्यासाठी राज्य सरकारने आयकर विभागाकडून माहिती मागवून अर्जांची छाननी सुरू केली आहे. चारचाकी वाहने असणाऱ्या महिलांच्या अर्जांची परिवहन विभागाची मदत घेत पडताळणी होत आहे. काही लाभार्थी एकापेक्षा जास्त योजनांचा लाभ घेत असल्याचे तर काही कुटुंबांमध्ये दोनपेक्षा जास्त लाभार्थी असल्याचे निदर्शनास आले आहे. अनेक महिला लाभार्थींबाबतीत असे आढळून आले आहे, की आधार कार्डावर नाव वेगळे तर बँकेत नाव वेगळे आहे, अशा अर्जांची पडताळणी सुरू आहे.

दुसऱ्या बाजूला ‘लाडकी बहीण योजनेच्या नावाने परराज्यातील टोळीकडून फसवणूक केली गेल्याचा प्रकारही समोर आला आहे. मुंबईतील जुहू पोलिसांनी एका दांपत्यासह ४ जणांवर नुकताच गुन्हा दाखल केला. गुजरातमधील एक मोठी टोळी नागरिकांच्या नावाने बनावट खाती उघडून त्यांच्या खात्यावरील योजनांचे पैसे लुबाडत असल्याचे तपासात उघड झाले. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात विविध नागरिकांची बँक खाती आणि इतर साहित्यांची कागदपत्रे पोलिसांनी जप्त केली. लाडकी बहीण योजनेच्या नावाने सर्वसामान्य नागरिकांची बँक खाती तयार करून त्यांचा सायबर गुन्ह्यांसाठी वापर केला गेला. लाडकी बहीण योजना महिलांसाठी असली तरी, आरोपींनी तयार केलेली बहुतांश बँक खाती पुरुषांची असल्याची बाब उघड झाली आहे. पोलिसांनी तपासात १०० हून अधिक बनावट खाती बंद करून सरकारच्या तिजोरीतून जाणारी १९ लाखांहून अधिक रक्कम थांबवण्यात यश मिळविले, ही चांगली बाब म्हणावी लागेल. एकूण छाननीनंतर अपात्र महिलांची संख्या वाढणार, हे निश्चित. सरकारच्या आवाहनानंतर साडेचार हजार महिलांनी स्वत:हून अर्ज करून या योजनेतून आपली नांवे काढून घेतली. त्यामुळे या महिला सुरुवातीला मिळालेले पैसे परत करतील का? हा मोठा प्रश्न आहे. या योजनेअंतर्गत अपात्र लाभार्थींच्या खात्यावर गेलेले पैसे हे सर्वसामान्य करदात्यांच्या पैशांचा अपव्यय आहे, असे प्रश्न जनतेतून उपस्थित केले जात असल्याने राज्य सरकारने योजनांची अंमलबजावणी करताना किती काळजी घ्यायला हवी, ही गोष्ट अधोरेखित होते.

तळागाळातील सर्व घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाकडून विविध योजना जाहीर केल्या जातात. ‘कल्याणकारी राज्य’ या संकल्पनेवर शासनाचा कारभार चालतो. या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपासून समाजातील वंचित घटकांना मिळवून देण्यासाठी शासनाकडूनही तसे प्रयत्न केले जातात. विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेतल्याने आदिवासी घटकांपासून गरीब वर्गातील व्यक्तींना आतापर्यंत त्याचा फायदा झाला आहे.

# रक्षाबंधन....




रक्षाबंधन (राखी) बद्दल
वर्धापनदिन कूपन
रक्षाबंधनासाठी भेटवस्तूंच्या कल्पना
मुलांसाठी राखी ऑनलाइन
मुलांची राखी कीबोर्ड– बाण– उजवा
बहिणीसाठी राखी भेटवस्तू ऑनलाइन
बहिणीसाठी भेटवस्तू कीबोर्ड– बाण– उजवा
राखी ऑनलाइन
राखीकीबोर्ड– बाण– उजवा
वैयक्तिकृत राखी ऑनलाइन
वैयक्तिकृत कीबोर्ड– बाण– उजवा
चॉकलेटसह राखी ऑनलाइन
चॉकलेट कीबोर्ड– बाण–उजवा
भैय्या भाभीसाठी राखीचा सेट
राखीचा सेट कीबोर्ड– बाण– उजवा

भाऊ आणि बहिणीमधील नाते हे केवळ अद्वितीय आहे आणि शब्दात वर्णन करण्यापलीकडे आहे. भावंडांमधील नाते असाधारण आहे आणि जगाच्या प्रत्येक भागात त्याला महत्त्व दिले जाते. तथापि, जेव्हा भारताचा विचार केला जातो तेव्हा हे नाते अधिक महत्त्वाचे बनते कारण भावंडांच्या प्रेमासाठी समर्पित षरक्षाबंधनष नावाचा सण असतो.

हा एक खास हिंदू सण आहे जो भारत आणि नेपाळसारख्या देशांमध्ये भाऊ आणि बहिणीमधील प्रेमाचे प्रतीक म्हणून साजरा केला जातो. रक्षाबंधन हा सण हिंदू चंद्र-सौर कॅलेंडरच्या श्रावण महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी साजरा केला जातो, जो सामान्यत: ग्रेगोरियन कॅलेंडरच्या ऑगस्ट महिन्यात येतो.

रक्षाबंधनाचा अर्थ

हा सण ‘रक्षा’ आणि ‘बंधन’ या दोन शब्दांपासून बनलेला आहे. संस्कृत भाषेत या सणाचा अर्थ ‘संरक्षणाची गाठ’ असा होतो जिथे ‘रक्षा’ म्हणजे संरक्षण आणि ‘बंधन’ म्हणजे बांधणे या क्रियापदाचा अर्थ. एकत्रितपणे, हा सण भाऊ-बहिणीच्या नात्यातील शाश्वत प्रेमाचे प्रतीक आहे ज्याचा अर्थ केवळ रक्ताचे नाते नाही. हा सण चुलत भाऊ, बहीण आणि वहिनी (भाभी), भाऊबंदकी (बुआ) आणि पुतण्या (भातीजा) आणि अशा इतर नातेसंबंधांमध्ये देखील साजरा केला जातो.

भारतातील विविध धर्मांमध्ये रक्षाबंधनाचे महत्त्व

हिंदू धर्म – हा सण प्रामुख्याने भारताच्या उत्तर आणि पश्चिम भागात, नेपाळ, पाकिस्तान आणि मॉरिशस सारख्या देशांमध्ये हिंदूंद्वारे साजरा केला जातो.

जैन धर्म – जैन समुदायातही हा प्रसंग पूजनीय आहे जिथे जैन पुजारी भक्तांना औपचारिक धागे देतात.

शीख धर्म – भाऊ-बहिणीच्या प्रेमाला समर्पित हा सण शीख लोक ‘राखडी’ किंवा राखरी म्हणून साजरा करतात.

रक्षाबंधन सणाची उत्पत्ती

रक्षाबंधनाचा सण शतकानुशतके पूर्वीपासून सुरू झाला आहे आणि या विशेष सणाच्या उत्सवाशी संबंधित अनेक कथा आहेत. हिंदू पौराणिक कथांशी संबंधित काही विविध कथा खाली वर्णन केल्या आहेत:

इंद्र देव आणि शची – भविष्य पुराणातील प्राचीन आख्यायिकेनुसार, एकदा देव आणि दानवांमध्ये भयंकर युद्ध झाले. आकाश, पाऊस आणि विजांचे प्रमुख देवता भगवान इंद्र, देवांच्या बाजूने युद्ध लढत होते, त्यांना शक्तिशाली राक्षस राजा बालीकडून तीव्र प्रतिकार होत होता. युद्ध बराच काळ चालू राहिले आणि निर्णायक शेवटापर्यंत पोहोचले नाही. हे पाहून, इंद्राची पत्नी शची भगवान विष्णूकडे गेली ज्यांनी तिला कापसाच्या धाग्यापासून बनवलेले एक पवित्र ब्रेसलेट दिले. शचीने तिच्या पतीच्या मनगटाभोवती पवित्र धागा बांधला, भगवान इंद्राने शेवटी राक्षसांचा पराभव केला आणि अमरावती परत मिळवली. उत्सवाच्या पूर्वीच्या कथेत हे पवित्र धागे ताबीज असल्याचे वर्णन केले आहे जे महिला प्रार्थनेसाठी वापरत असत आणि युद्धाला जाताना त्यांच्या पतीला बांधले जात असत. सध्याच्या काळाप्रमाणे, ते पवित्र धागे केवळ भाऊ-बहिणीच्या नात्यापुरते मर्यादित नव्हते.

राजा बाली आणि देवी लक्ष्मी – भागवत पुराण आणि विष्णू पुराणातील एका कथेनुसार, जेव्हा भगवान विष्णूने राक्षस राजा बालीकडून तिन्ही लोक जिंकले, तेव्हा त्याने राक्षस राजाने त्याच्या शेजारी राजवाड्यात राहण्यास सांगितले. भगवानांनी विनंती मान्य केली आणि राक्षस राजासोबत राहू लागले. तथापि, भगवान विष्णूची पत्नी देवी लक्ष्मी त्याच्या मूळ गावी वैकुंठात परत येऊ इच्छित होती. म्हणून, तिने राक्षस राजा बालीला राखी बांधली आणि त्याला भाऊ बनवले. परतफेडीबद्दल विचारल्यावर, देवी लक्ष्मीने बालीला तिच्या पतीला व्रतातून मुक्त करून वैकुंठात परत येऊ देण्यास सांगितले. बाली विनंती मान्य करतो आणि भगवान विष्णू त्याची पत्नी देवी लक्ष्मीसह त्याच्या घरी परततात.

संतोषी माँ – असे म्हटले जाते की भगवान गणेशाचे दोन पुत्र शुभ आणि लाभ यांना बहीण नसल्याने निराशा झाली होती. त्यांनी त्यांच्या वडिलांकडून बहीण मागितली, ज्यांनी संत नारदांच्या हस्तक्षेपामुळे शेवटी त्यांच्या बहिणीला मान दिला. अशाप्रकारे भगवान गणेशाने दिव्य ज्वालांद्वारे संतोषी माँची निर्मिती केली आणि भगवान गणेशाच्या दोन्ही पुत्रांना रक्षाबंधनाच्या निमित्ताने त्यांची बहीण मिळाली.

कृष्ण आणि द्रौपदी – महाभारतातील एका कथेनुसार, महायुद्धापूर्वी पांडवांची पत्नी द्रौपदीने भगवान श्रीकृष्णाला राखी बांधली होती तर कुंतीने नातू अभिमन्यूला राखी बांधली होती.

यम आणि यमुना – आणखी एक आख्यायिका अशी आहे की मृत्युदेव यम आपली बहीण यमुनाला घह्म वर्षे भेटला नाही आणि शेवटी ती खूप दु:खी झाली. गंगेच्या सल्ल्यानुसार यम आपली बहीण यमुनाला भेटायला गेला, जिने खूप आनंद केला आणि तिचा भाऊ यम याचे आतिथ्य केले. यामुळे यम आनंदित झाला आणि यमुनाला भेट मागितली. तिने आपल्या भावाला पुन्हा पुन्हा भेटण्याची इच्छा व्यक्त केली. हे ऐकून यमने आपली बहीण यमुनाला अमर केले जेणेकरून तो तिला पुन्हा पुन्हा पाहू शकेल. ही पौराणिक कथा ‘भाईदूज’ नावाच्या सणाचा आधार बनवते जो भाऊ-बहिणीच्या नात्यावर देखील आधारित आहे.

हा उत्सव साजरा करण्याचे कारण

रक्षाबंधन हा सण भाऊ आणि बहिणींमधील कर्तव्याचे प्रतीक म्हणून साजरा केला जातो. हा सण स्त्री आणि पुरुषांमधील कोणत्याही प्रकारच्या भावा-बहिणीच्या नात्याचा उत्सव साजरा करण्यासाठी आहे, जे जैविकदृष्ट्या संबंधित नसतील.

या दिवशी, बहीण आपल्या भावाच्या मनगटाभोवती राखी बांधते आणि त्याच्या समृद्धीसाठी, आरोग्यासाठी आणि कल्याणासाठी प्रार्थना करते. त्या बदल्यात भाऊ भेटवस्तू देतो आणि कोणत्याही परिस्थितीत आपल्या बहिणीचे कोणत्याही संकटापासून रक्षण करण्याचे वचन देतो. हा सण दूरच्या कुटुंबातील सदस्य, नातेवाईक किंवा चुलत भावांमध्ये देखील साजरा केला जातो.

# मारुंजीत कै. रमेश बुचडे यांच्या ५ व्या स्मरणार्थ किर्तन सेवा संपन्न




मारुंजी :– सौ. शुभांगी भोर

मारुंजीमध्ये कै. रमेश चिंधू बुचडे यांच्या पाचव्या स्मरणार्थ ह भ प श्री विक्रांत महाराज पोंडके श्री जोग शिक्षण संस्था आळंदी यांचा कीर्तनाचा कार्यक्रम काळभैरवनाथ मंदिर येथे पार पडला महाराजांनी आपले कीर्तनातून सारासार विचार का केला पाहिजे याविषयी मार्मिक उदाहरणासह कीर्तनात रंग भरला पंचक्रोशीतील वारकरी सांप्रदायिक मधील भाविक मोठ्य प्रमाणात उपस्थित होते कीर्तनाची सांगता झाल्यानंतर महाप्रसादाचा आयोजन श्री अमर बुचडे नवनाथ बुचडे अक्षय रमेश बुचडे समस्त बुचडे मित्रपरिवार परिवार यांनी अन्न प्रसादचा कार्यक्रम आयोजित केला होता

निर्भिड पत्रकारितेचा दमदार आवाज...!
नियमित वाचा साप्ताहिक युवा मराठा आजच वार्षिक वर्गणीदार व्हा

# राजेंद्र पाटील– राऊत यांच्याविषयी थोडेसं...!



लोक म्हणातात तू अन्यायाविरोधात बिनधास्त भिडतो. हे कौतुक माझ्या वाट्याला येण्याचं कारण म्हणजे राजेंद्र पाटील राऊत मुख्य संपादक युवा मराठा न्यूजपेपर्स अँन्ड वेब न्यूज चॅनल महाराष्ट्र हे गत चाळीस वर्षापासून पत्रकारितेत आहेत. त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक प्रश्नांना वाचा फोडली आहे. गोरगरीब सर्वसामान्य नागरिकांसाठी लढून त्यांना त्यांनी न्याय मिळवून दिला आहे. महाराष्ट्रातील अनेक नामांकित वृत्तपत्रात त्यांनी पत्रकार म्हणून सेवा केलेली आहे. त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झालेले असून, ते सध्या युवा मराठा महासंघ महाराष्ट्र या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आहेत. तर आश्रयआशा फाऊंडेशन वऱ्हाणे या बहुउद्देशीय संस्थेचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत.त्यांनी अनेक लोकचळवळीमध्ये सहभाग घेऊन विविध आंदोलने केलेली आहेत. मी हे जे काही करु शकतोय, त्याचं सगळं श्रेय राजेंद्र पाटील राऊत सराचं आहे.

कौतुक आमच्या वाट्याला आणि हलाहल संपादकांना प्यावं लागतं. ते निमूटपणे सगळं पचवतात. आम्हाला मात्र चांगल्या गोष्टींसाठी प्रोत्साहन देतात. दिशा दाखवतात. चुकलं तर कान धरतात. इमोशनल होवू नको असं कायम बजावतात. काळजीही करतात. स्वत: पडद्यामागे राहून. अगदी मनापासून सांगतोय, हे वाटतं तितकं सोपं नाहीय. आजच्या काळात तर नाहीच नाही. याला माणसाचं मन खूप मोठं लागतं.

पत्रकार होण्यासाठी धडपडत होतो, पण राजेंद्र पाटील राऊत सरांनी माझ्यासाठी दार उघडलं. मला संधी दिली. सगळं शिकून घे म्हणाले. रिपोर्टिंगची पहिली संधी त्यांनीच दिली. या जगात टॅलेंट असलेले कितीतरी लोक आहेत. पण संधी महत्वाची असते मित्रांनो. गावातून आलेल्या एका पोरावर त्यांनी विश्वास टाकला. ज्याला धड कपडे घातला येत नव्हते. नीट बोलता येत नव्हतं. प्रचंड न्यूनगंडग्रस्त होतो तरीही विश्वास दाखवला. असा मी एकटाच नाही, त्यांनी कितीतरी जणांना संधीचं दार उघडून दिलंय. मोठं केलंय. पण कधीच त्याची वाच्यता केली नाही. तो त्यांचा स्वभाव नाही.

आपला आजीवन ऋणी स्वप्निल बापू देशमुख, राष्ट्रीय अध्यक्ष युवा मराठा महासंघ महाराष्ट्र, सहसंपादक युवा मराठा न्यूजपेपर्स अँन्ड वेब न्यूज चॅनल

# मारुंजी ग्रामस्थांचा रस्ता रुंदीकरणाला विरोध पर्यायी मार्ग आणि योग्य मोबदल्याची मागणी

(पान १ वरुन)

सभेला शिवाजी बुचडे पाटील मारुंजी ते कासरसाई मुख्यरस्ता ३६ मीटर करण्याची गरज आहे का हिंजवडी मान या ठिकाणी २४ मीटरचा रस्त्यासाठी ग्रामस्थ आग्रही आहेत ३६ मीटर च्या रस्त्यामध्ये बाधित शेतकऱ्यांना मोबदला कशा स्वरूपात देणार आहे याची चर्चा या ग्रामसभेमध्ये करून त्याचा ठराव पास करून मुख्यमंत्री पालक उपमुख्यमंत्री नगर विकास मंत्री एकनाथरावजी शिंदे यांना निवेदन देऊन त्याचा पाठपुरावा करावा अशी सर्व ग्रामस्थांना सुचित केले या सभेचा विषय ग्रामविकास अधिकारी रायकर साहेब यांनी सर्व ग्रामस्थांचे स्वागत करून कासरसाई मारुंजी रस्ता रुंदी करण्याबाबत आपल्या सूचना ईश्वर बुचडे माजी सरपंच मुख्य रस्त्याला खड्डे पडले ग्रामपंचायत जबाबदार रस्त्यावर पाणी कुठून येते याची कोणी दखल घेत नाही रस्त्यावरील खड्डे बुजवणे हे पीडब्ल्यूडी व जिल्हा परिषद चे काम आहे पाठीमागील काही दिवसात मदरसन समोरचा खड्डा काही म न से कार्यकर्त्यांनी स्वखर्चातून बुजवला दत्तात्रय बुचडे मारुंजी चा उल्लेख आढळतो गावातील मुख्य रस्त्याचे रुंदीकरण १९९६ चा उल्लेख आढळतो ही ग्रामसभा या अगोदर घेतले असतील तर एवढे नुकसान झालं नसतं

सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते

शिवाजी बुचडे पाटील मारुंजी ते कासरसाई मुख्यरस्ता ३६ मीटर करण्याची गरज आहे का हिंजवडी मान या ठिकाणी २४ मीटरचा रस्त्यासाठी ग्रामस्थ आग्रही आहेत ३६ मीटर च्या रस्त्यामध्ये बाधित शेतकऱ्यांना मोबदला कशा स्वरूपात देणार आहे याची चर्चा या ग्रामसभेमध्ये करून त्याचा ठराव पास करून मुख्यमंत्री पालक उपमुख्यमंत्री नगर विकास मंत्री एकनाथरावजी शिंदे यांना निवेदन देऊन त्याचा पाठपुरावा करावा अशी सर्व ग्रामस्थांना सुचित केले

ईश्वर बुचडे माजी सरपंच मुख्य रस्त्याला खड्डे पडले ग्रामपंचायत जबाबदार रस्त्यावर पाणी कुठून येते याची कोणी दखल घेत नाही रस्त्यावरील खड्डे बुजवणे हे पीडब्ल्यूडी व जिल्हा परिषद चे काम आहे पाठीमागील काही दिवसात मदरसन समोरचा खड्डा काही म न से कार्यकर्त्यांनी स्वखर्चातून बुजवला

दत्तात्रय बुचडे मारुंजी चा उल्लेख आढळतो गावातील मुख्य रस्त्याचे रुंदीकरण १९९६ चा उल्लेख आढळतो ही ग्रामसभा या अगोदर घेतले असतील तर एवढे नुकसान झालं नसत कृष्णा दादा बुचडे आम्ही पीएमआरडीच्या संपर्कात होतो

अंकुश जगताप पत्रकार एमआयडीसी ने काही गायनाची जमीन घेतली तसेच भानुसे अडव बेल आढव येथील जमिनी एमआयडीसी घेतल्या त्या बदल्यात गावाला रस्ता मिळाला असता परंतु त्याबद्दल ग्रामपंचायतीने उठाव केला नाही

संतोष बुचडे हिंजवडी भांडते मान भांडते मारुंजी का भांडत नाही रस्त्यासाठी आयटी पार्क मधील बहुतेक कामगार हे मारुंजी मध्यमध्ये वास्तव्याला आहे आपल्याला पर्यायी चार रस्ते आहेत तरीपण हा शंभर फुटी करण्याचा घाटका याचे लेखी निवेदन नगर विकास मंत्री एकनाथराव शिंदे मुख्यमंत्री पालकमंत्री अजित दादा पवार यांना देऊन त्याचा पाठपुरावा करूया

हनुमंत बुचडे आमच्या शिवारात ड्रेनेजचे पाणी सर्व शेतात व विहिरीमध्ये जात आहे ग्रामपंचायत मुळे काही होणार नाही तरी कार्पोरेशन ची त्यांनी मागणी केली सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते



# राष्ट्रीय महामार्ग ४८ चे रुंदीकरण करा, खा.श्रीरंग बारणें चे नितीन गडकरींना साकडे

पुणे निवासी संपादक उमेश पाटील

पुणे – पुणे, पिंपरी–चिंचवडमधून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ ची दुरवस्था झाली आहे. स्त्यांवरील खड्डे व अरुंद लेनमुळे वाहतूक कोंडी व अपघात वाढले आहेत. त्यामुळे या महामार्गाची सुधारणा करावी. रस्त्याची रुंदी वाढवावी, नव्याने डांबरीकरण करावे, उड्डाणपूल बनविण्यात यावेत. वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे साकडे मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना घातले.

खासदार बारणे यांनी दिल्लीत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. या महामार्गाची परिस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून दिली. खासदार बारणे म्हणाले, पुणे शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. कार्ला फाटा, वडगाव फाटा, तळेगाव फाटा आणि देहूरोड फाटा या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होते. उड्डाणपूलांची कमतरता आणि रुंदीकरणाचा अभाव यामुळे या मार्गावर वाहतुकीची स्थिती अधिकच बिकट झाली असून, नागरिकांच्या दैनंदिन प्रवासावर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. या महामार्गाच्या उन्नयनामुळे पुणे शहरातून होणारी वाहतूक अधिक सुरळीत होईल आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल.

पिंपरी–चिंचवड शहराच्या हद्दीतील राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ च्या लगतच्या सेवा रस्त्यांचा विस्तार झाल्यास, वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. हा मार्ग सद्यस्थितीत खराब अवस्थेत असून दुरुस्ती व रुंदीकरणाची तातडीची गरज आहे. रस्त्यांवरील खड्डे व अरुंद लेनमुळे वाहतूक कोंडी व अपघात वाढले आहेत. अनेक ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ अरुंद असल्याने वाहतूक कोंडी होते. त्यामुळे रस्त्याची रुंदी वाढवावी. जुन्या आणि खराब झालेल्या रस्त्यांवर नवीन डांबरीकरण करून, रस्त्याची गुणवत्ता सुधारावी. यामुळे प्रवासाचा वेग वाढेल आणि सुरक्षितता देखील वाढेल. या उपाययोजना त्वरित केल्यास प्रवास सुरक्षित, जलद व सुलभ होईल.

पुणे हे महाराष्ट्राच्या मध्यवर्ती ठिकाणी असून कोल्हापूर, सोलापूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर व नाशिक यांसारख्या शहरांशी जोडणारे राष्ट्रीय महामार्ग आहेत. वाढत्या वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर या मार्गांचे तातडीने रुंदीकरण आवश्यक आहे. यामुळे प्रवास सुलभ होईल, व्यापाराला गती मिळेल आणि अपघातांचे प्रमाण कमी होईल. या मार्गाचे विस्तारीकरण, उड्डाणपुलांची निर्मिती व पायाभूत सुधारणा केल्यास पश्चिम भारताचा वेगवान व शाश्वत विकास अधिक सुलभ होईल. या कामांसाठी तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली

# प्रांताधिकारी किरण सावंत पाटील पुरस्काराने सन्मानित...

श्रीरामपूर दिपक कदम – श्रीरामपूर विभागाचे प्रांताधिकारी तथा इंडियन रेड क्रॉसचे अध्यक्ष किरण सावंत पाटील यांना महसूल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी अहिल्यांनगर यांचे शुभहस्ते उत्कृष्ठ उपजिल्हाधिकारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले

त्यानिमित्त इंडियन रेड सोसायटीचेवतीने किरण सावंत पाटील यांचा रेड क्रॉस उपाध्यक्ष तथा ह मिलिंदकुमार वाघ यांचे हस्ते सन्मानचिन्हदेवून सन्मानित करण्यात आले

यावेळी भरत कुंकुलोळ, सुनील साळवे प्रवीण साळवे, पोपटराव शेळके, सुरांजन साळवे, श्रावण भोसले. सुरेश वाघुले, सचिन चंदन, सुरजन साळवे विश्वास भोसले आदींसह मान्यवर उपस्थित होते

# अजित पवारांविरोधात ग्रामस्थ आक्रमक रस्त्यावरुन न्यायालयात जाण्याचा इशारा!

पान १ वरुन

रुंदीकरणात जाणार आहे. यावरून हिंजवडी ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. सध्या हा रस्ता ३० मीटर ऐवजी २४ मीटर चा करण्यात यावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.या रस्त्या दरम्यान मंदिरे, शाळा, दशविधी घाट, ग्रामपंचायतच कार्यालय, स्मशानभूमी आहे. ५०– ५० वर्षांपूर्वीची घरे आहेत. यामुळे रस्ता रुंदीकरण करताना तो कमी करण्यात यावा अशी मागणी ग्रामस्थ यांनी केली आहे. याबाबत लवकरच उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन सांगणार असल्याचं सरपंच गणेश जांभुळकर यांनी सांगितलं आहे. अजित पवारांनी ग्रामस्थांचं न ऐकल्यास न्यायालयात जाण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. वेळ पडल्यास हिंजवडीत नेते आल्यास आमच्या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी आम्ही आंदोलन करून रस्त्यावर उतरू असा इशारा देण्यात आला आहे. हे सर्व पाहता उपमुख्यमंत्री अजित पवार काय निर्णय घेतात हे बघावं लागेल.

**झाडे लावा !**
**झाडे जगवा !!**
**निसर्ग वाचवा !!!**




# विंचूर उपबाजाराकरिता सुभाषनगर येथील ८ हेक्टर ६१.५६ आर जागा राज्य शासनाकडून मंजूर

## सभापती डी.के.नाना जगताप यांची माहिती

**दैनिक युवा मराठा : निफाड नाशिक रामभाऊ आवारे तालुका प्रतिनिधी**

लासलगांव बाजार समितीस विंचुर उपबाजार आवाराकरीता मौजे सुभाषनगर ग्रामपंचायत हद्दीतील ०८ हेक्टर ६१.५६ आर जागा राज्य शासनाकडुन शासकीय दराने मंजुर झाली असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर (डी. के.) जगताप व उपसभापती संदीप (ललित) दरेकर यांनी दिली. लासलगांव बाजार समितीने विंचुर व परीसरातील कांदा व सर्व प्रकारचा भुसार, तेलबिया शेतीमाल उत्पादक शेतकरी बांधवांना जवळच शेतीमाल विक्रीची सोय निर्माण व्हावी यासाठी विंचुर येथे उपबाजार आवार सुरू केलेले आहे. त्यासाठी बाजार समितीने स्व:मालकीची ०२ हे ४० आर जागा खरेदी करून सदर जागेत कांदा, भुसार व तेलबिया ह्या शेतीमालाचे लिलाव सुरू केलेले आहे. तसेच सदर जागेत शेतकरी बांधवांसाठी भुईकाटा, गोदाम, कॅन्टीन, पिण्याच्या पाण्याचा आर. ओ. प्लॅन्ट, पाण्याची टाकी, कार्यालयीन इमारत इ. सुविधा निर्माण केलेल्या आहे.परंतू विंचुर उपबाजार आवारावर व्यापारी वर्ग व बाजार समितीकडुन दररोज मिळणाऱ्या चांगल्या सेवा व सुविधांमुळे दिवसेंदिवस सदर बाजार आवारावर कांदा, भुसार व तेलबिया ह्या शेतीमालाची मोठ्या प्रमाणात उलाढाल होऊ लागल्याने बाजार समितीस सदरची जागा अपुरी पडु लागली. त्यामुळे बाजार समितीच्या तत्कालीन सभापती सौ. सुवर्णा जगताप व त्यांच्या सहकारी सदस्य मंडळाने विंचुर उपबाजार आवाराकरीता छत्रपती संभाजी नगर—नाशिक महामार्गालगत विंचुर एमआयडीसी जवळील मौजे सुभाषनगर ग्रामपंचायत हद्दीतील ०८ हेक्टर ६१.५६ आर जागा शासकीय दराने खरेदी करून सदर जागेत शेतकरी बांधवांसाठी प्रशस्त बाजार आवार, वॉल कंपाऊंड, कॉंक्रीटीकरण, भुईकाटा, पिण्याचे



पाणी, शेतकरी निवास, कार्यालयीन इमारत इ. आवश्यक सोईसुविधा निर्माण करून कांदा, भुसार, तेलबिया, बेदाणा, फळे व भाजीपाला इ. शेतीमालाचे लिलाव सुरू करण्याचे ठरविले होते. त्यानुसार बाजार समितीने सदर जागा शासकीय दराने संपादीत करणेसाठी आवश्यक त्या सर्व शासकीय विभागांच्या मंजुरी व शिफारशी घेऊन तसा प्रस्ताव तत्कालीन सभापती सौ. सुवर्णा जगताप यांनी सन २०२१ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या महसुल विभागाकडे पाठविला होता. त्यानंतर बाजार समितीच्या तत्कालीन सभापती सौ. सुवर्णा जगताप, बाळासाहेब क्षिरसागर व विद्यमान सभापती ज्ञानेश्वर (डी. के.) जगताप आणि त्यांचे सर्व सहकारी सदस्यांनी वेळोवेळी संबंधित मंत्री महोदयांकडे पाठपुरावा केला होता. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने बुधवार, दि. ०६/०८/२०२५ रोजी बाजार समितीस विंचुर उपबाजार आवाराकरीता मौजे सुभाषनगर ग्रामपंचायत हद्दीतील ०८ हेक्टर ६१.५६ आर जागा उपबाजार या सार्वजनिक प्रयोजनासाठी नाममात्र रू. १/— या दराने कब्जेहक्काची रक्कम आकारून व वसुल करून मंजुर केली असल्याचे कळविले आहे.

बाजार समितीस सदरची जागा शासकीय दराने संपादित करून मिळणेसाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब, महसुल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे साहेब, आपत्ती व्यवस्थापन मंत्री ना. गिरीश महाजन साहेब, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री ना. छगनरावजी भुजबळ साहेब, पणन मंत्री ना. जयकुमार रावल साहेब, निफाडचे आमदार दिलीप काका बनकर साहेब, बाजार समितीचे ज्येष्ठ सदस्य जयदत्त होळकर, पंढरीनाथ थोरे, राजेंद्र डोखळे, महसुल, पणन व वनविभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी, सुभाषनगर ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्य, सचिव नरेंद्र वाढवणे, सहसचिव प्रकाश कुमावत यांचेसह सर्व सदस्य मंडळाचे मोठे योगदान लाभले असल्याचे जगताप यांनी सांगितले.

# ‘१०८’ चा फसवा भरोसा— गरीबाच्या मृत्यूला जबाबदार कोण? व्यवस्थेवर उभं राहिलं प्रचंड प्रश्नचिन्ह!

कुरखेडा /गडचिरोली सुरज गुंडमवार

‘मी सगळं करून पाहिलं... फोन, धावपळ, याचना — पण वेळेवर फक्त मृत्यूच आला!’ — ही वेदनादायी प्रतिक्रिया आहे अप्रव पुरंदर भैसारे यांची. त्यांच्या कुटुंबातील सदस्य प्रमिला श्यामराव भैसारे यांचा दुर्दैवी मृत्यू केवळ आरोग्य यंत्रणेच्या ढिसाळपणामुळे झाला. गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा तालुक्यात ही घटना घडली असून, संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे. एकाकी झगडणाऱ्या एका तरुणाच्या डोळ्यांसमोर त्याच्या प्रिय व्यक्तीचा जीव जातो, आणि त्याला मदतीच्या नावाने फक्त ‘प्रशासनाची पाठ फिरवलेली पाठ’ दिसते — ही वस्तुस्थिती आज आपल्यासमोर आहे.

‘१०८’ वर कॉल... पण रुग्णवाहिकेऐवजी आली निराशा

४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ वाजता दरम्यान प्रमिला श्यामराव भैसारे यांची तब्येत अचानक बिघडली. त्यावर त्वरित १०८ क्रमांकावर संपर्क साधण्यात आला. कोरची येथून “एका तासात गाडी पोहोचेल,” असे सांगण्यात आले. तात्काळ सेवा देण्याऐवजी चुकीचा सल्ला आणि दिलेला ड्रायव्हरचा फोन बंद होता.अखेर खासगी वाहनाने त्यांना कुरखेडा उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. तिथून गडचिरोली जिल्हा रुग्णालयात रेफर करण्यात आले. मात्र तिथेही १०८ सेवा अनुपलब्धच होती.




‘१०२ गाडी हवी असेल, तर २४०० रुपये द्या’ अशी मागणी रुग्णालय कर्मचाऱ्यांनी केली — जणू जीव वाचवणे हेही आता खरेदी करण्याचे प्रकरण झाले आहे! त्यानंतर काही तासांतच, ५ ऑगस्ट रोजी सकाळी प्रमिला भैसारे यांचे दु:खद निधन झाले.

न्याय मागणारा तरुण — बेपर्वा यंत्रणा—

अप्रव भैसारे यांनी आपल्या आजारी नातेवाइकासाठी शर्थीचे प्रयत्न केले. पण जेव्हा यंत्रणा असंवेदनशील, असंवधान आणि भ्रष्ट असते — तेव्हा सामान्य माणसाचे प्रयत्न अपुरे ठरतात.

सरकारी सेवा, आपत्कालीन सुविधा, आणि ‘मोफत’ आरोग्य हक्क यांची बिनधास्त पायमल्ली ही आजची कठोर वास्तवता आहे.

प्रश्न — जे प्रत्येक नागरिकाने विचारलेच पाहिजेत:

१०८ सेवा वेळेवर पोहोचत नसेल, तर ती सेवा चालूच कशासाठी ठेवली आहे?

रुग्ण वाहतूक सेवेसाठी पैशांची उघड मागणी करणं — हे कायदेशीर आहे का?

गरीबांसाठी असलेली मोफत आपत्कालीन सेवा — कागदापुरतीच का राहते आहे?

तक्रार दाखल — चौकशीची मागणी

या घटनेबाबत उपसरपंच भैसारे यांनी तात्काळ तालुका वैद्यकीय अधिकारी कुरखेडा यांच्याशी तोंडी तक्रार करत त्यांनी आमच्या कडे १०२ गाडीची जिम्मेदारी आहे, १०८ ची तक्रार साठी आपण तालुका अधीक्षक यांच्या सोबत चर्चा करा म्हणले परंतु त्या वेळी तालुका अधीक्षक अनुउपस्थित असल्याने दुसऱ्या दिवसी उपजिल्हा रुग्णालय, कुरखेडा येथे लेखी तक्रार दाखल केली असून दोषींवर कठोर कारवाई, अपुऱ्या आपत्कालीन सेवांची पुनर्रचना आणि अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ठोस उपाययोजना, १०२ आणि १०८ गाडीवर स्पष्ट उल्लेख करण्याची मागणी केली आहे. ‘मी एक माणूस वाचवू शकलो नाही — कारण यंत्रणेला काहीच फरक पडत नव्हता. माझी तडफड त्यांच्या नियमांआड दडपली गेली...’ — उपसरपंच अप्रव भैसारे यांचा हा संतप्त स्वर आता संपूर्ण जनतेचा आवाज बनत आहे. ही घटना केवळ एका कुटुंबाच्या दु:खाची कहाणी नाही — ही संपूर्ण व्यवस्थेवरचा आरोप आहे. जर प्रशासनाने जागरूकता आणि जबाबदारी घेतली नाही, तर अशा ‘प्रशासनघातकी मृत्यू’ पुन:पुन्हा घडत राहतील.

‘आता थांबा!’ म्हणण्याची वेळ आली आहे — अन्यथा ही व्यवस्था जीव घेते, आणि मूक बनते.

# वडार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध – आ. तुषार राठोड

मराठवाडा विभागीय संपादक मनोज बिरादार

मुखेड शहरातील शनिदेव मंदिर परिसरातील भवानी गल्ली येथे श्रावण मासानिमित्त आयोजित महाआरती कार्यक्रमात आमदार डॉ. तुषार राठोड यांनी वडार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सदैव तत्पर आणि कटिबद्ध असल्याचे स्पष्ट प्रतिपादन केले.

भवानी गल्लीतील मारुती मंदिरात श्रावण महिन्याच्या प्रत्येक शनिवारी महाआरतीचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमासाठी भाजपाचे स्थानिक कार्यकर्ते विनोद दंडलवाड हे पुढाकार घेत असून, या उपक्रमात स्थानिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग आहे. श्रावणातील पहिल्या शनिवारी झालेल्या महाआरतीस प्रमुख पाहुणे म्हणून आमदार डॉ. तुषार राठोड



उपस्थित होते. यावेळी त्यांचा भवानी गल्लीतील रहिवाशांच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अॅड. खुशालराव पाटील उमरदरीकर, जिल्हा परिषद सदस्य संतोष भाऊ बोनलेवाड, भाजपा शहराध्यक्ष नागनाथराव लोखंडे, किशोरसिंह चव्हाण, माजी नगरसेवक गोविंद घोगरे, गजू अकुलवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी संयोजक विनोद दंडलवाड यांनी आमदार डॉ. राठोड यांच्या माध्यमातून भवानी गल्लीमध्ये पार पडलेल्या विकासकामांचा आढावा मांडला. आमदार राठोड यांनी वडार समाज सभागृहासाठी ३५ लाख, भवानी मंदिरासाठी ३५ लाख, धुरपत माय मंदिरासाठी १० लाख, तर खंडोबा मंदिरासाठी २५ लाख रुपये निधी मंजूर केला असून, ही सर्व कामे पूर्ण झाली आहेत. यासोबतच गल्लीतील रस्ते व नाली बांधकामासाठी जवळपास १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

‘वडार समाज हा वंचित समाजघटक आहे. त्याच्या सर्वांगीण विकासासाठी माझ्या प्रयत्नांना अजून अधिक गती देणार आहे,’ असे स्पष्ट शब्दांत आमदार राठोड यांनी सांगितले.

या कार्यक्रमानंतर वडार समाजातील युवक आणि कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. खास करून विनोद दंडलवाड यांना भाजपाच्या वतीने नगरसेवक पदाची उमेदवारी मिळण्याची शक्यता असल्याच्या चर्चा उपस्थितांमध्ये रंगल्या.

आंशूराज प्रकाशनच्या मालकीचे हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पाटील—राऊत तथा र.र. राऊत यांनी नुरानी प्रिंटींग प्रेस , इस्लामपूरा मालेगांव येथे मुद्रीत करुन युवा मराठा कार्यालय, रुम नं. ५१/५२, मराठा भवन, महाराजा सयाजीराव गायकवाड पथ, मु.पो. कौळाणे(निं.), ता. मालेगांव, जि. नाशिक (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. **मुख्य कार्यालयः बी.डी.डी. नं.१५, डिलाईल रोड, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल (पुर्व), मुंबई-१३, पुणे कार्यालय पत्ताः स.नं.७६/७७, भोर वस्ती, रिपब्लीक लाईफ शेजारी, मारुंजी, मुळशी, पुणे. प्रेस कार्यालयः ९१४, सदाशिव पेठ, पुणे-३०.** मुद्रणदोष संभवनीय असतो. (कुठलाही वाद—विवाद मालेगांव न्यायालया अंतर्गत) या अंकातील, बातम्या, लेख व जाहिरातीशी संपादक, मालक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असेनाही. **❊ मुख्य संपादक : राजेंद्र पाटील-राऊत, ❊ व्यवस्थापकीय संपादक : श्रीमती आशाताई बच्छाव ❊ आवृत्ती संपादकः सुर्यकांत भोर, ❊ निवासी संपादक : उमेश पाटील, कार्यकारी संपादकः सौ.शुभांगी भोर,** (महत्वाचे युवा मराठा वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजूकराची शहनिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची युवा मराठा वृत्तपत्र व्यवस्थापन कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल युवा मराठा वृत्तपत्र व्यवस्थापन व मुद्रक, प्रकाशक, संपादक, मालक जबाबदार राहणार नाहीत. याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.) **❊ कायदेशीर सल्लागार - अॅड. प्रसाद संकपाळ, मुंबई हायकोर्ट,** Reg.No.MAH-MAR-२४१७२/२००३